**आर बी आय / २००५-०६/२९६**

डी जी बी ए. जी ए डी सं एच ११३०३/४५.०१.००३/ २००५-०६

फेब्रुवारी ०६,२००६
माघ१७, १९२७ (शक)

निवृत्तिवेतन प्रदान
करणाऱ्या सर्व बँका
(जोडलेल्या सूचीनुसार)

प्रिय महोदय,

**सार्वजनिक क्षेत्रातील बँकांतर्फे निवृत्तिवेतनाचे संवितरण - महागाई सहायताचे प्रदान**

शासनाने वेळेवेळी जाहीर केलेल्या महागाई सहायताचे / इतर भत्त्यांचे प्रतिनिधी बँकाकडून प्रदान करताना होणाऱ्या दिरंगाई बद्दल अनेक तक्रारी रिझर्व बँकेकडे येत आहेत.

२. महागाई सहायता / इतर भत्त्यां संदर्भात शासकीय आदेश जारी झाल्यापासून त्याच्या प्रदाना पर्यंतचा लागणारा वेळ कमी करण्यासाठी निवृत्तिवेतन प्रदान करणाऱ्या बँकांना दिनांक एप्रिल १२, २००३ च्या परिपत्रक डीजीबीए. जीएडी. एच- १७७/४५.०१.००३/ २००४-०५ सं. आणि दिनांक सप्टेंबर ८, २००४ च्या परिपत्रक डीजीबीए. जीएडी. सं. एच- ५०६/४५.०१.००१/ २००२-०३च्या द्वारे बँकांना रिझर्व बँकेच्या सूचनांसाठी न थांबता फॅक्स / इ-मेल ने दिलेल्या प्रतीच्या आधारावर किंवा संबंधित निवृत्तिवेतन प्रदान करणाऱ्या प्राधिकरणाच्या वेबसाईटच्या आधारावर कृती करण्यास सूचित केले होते.
३. आम्ही पुन्हा एकदा सूचित करतो की निवृत्तिवेतन प्रदान करणाऱ्या बँकांनी शासकीय आदेशांच्या प्रति मिळवून त्या त्यांच्या निवृत्तिवेतन प्रदान करणाऱ्या शाखांपर्यंत पोहोचवण्यासाठी ताबडतोब एक यंत्रणा स्थापन करावी; जेणेकरुन निवृत्तिवेतन धारकांना शासनाने जाहीर केलेले फायदे पुढील महीन्याच्या निवृत्तिवेतना सोबतच मिळावेत. पात्र निवृत्तिवेतन धारकांना शासकीय निवृत्तिवेतन अचूक व वेळेत संवितरण होण्यासाठी प्रतिनिधी बँकांच्या नियंत्रक कार्यालय / मुख्य कार्यालयांनी बारकाईने देखरेख ठेवणे आवश्यक आहे.
४. आम्ही असेही सूचित करतो की केंद्रीय नागरी व रेल्वे निवृत्ति धारकांच्या पासबुकांच्या पहिल्या पानावर नामांकन आवेदन पत्र ए व बी मधील नामांकीत व्यक्तीच्या नावाची पुष्टी करावी. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी आपल्या शाखांना निवृत्तिवेतन धारकांना निवृत्तिवेतन संवितरण योजनांतर्गत कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन होत असल्याची खात्री करुन घेण्यास सूचित करावे.
५. निवृत्तिवेतन प्रदान करण्याच्या योजना / नियमां विषयी बँकांच्या कर्मचाऱ्यां मध्ये जागरुकता वाढविण्यासाठी बँकांनी या विषयाचा त्यांच्या प्रशिक्षण संस्थातर्फे घेतल्या जाणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमांमधे समावेश करावा. आम्ही असेही सूचित करतो की निवृत्तिवेतन नियमांच्या ज्ञानाला कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या मूल्यांकनामधे योग्य ते महत्व दिले जावे.
७. या संदर्भात केलेल्या कारवाई संबंधी आम्हास अवगत करावे.

आपला विश्वासू

(एम. टी. वर्गीस)
महा व्यवस्थापक